सं.फौ.ख.क्र.१०५९/२०२३
शासन विरुध्द गणेश
नि.क्र.१२ खाली

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव –मिलिंद विपूल ताटे. ,
वय – ३४ वर्षे, कामधंदा - बाजार समिती वाई, सुपरवायझर,
राहणार– लोहारे, ता.वाई. जि.सातारा

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. आर. सुळ -**

दिनांक ०४.०५.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता मी बाजार समितीत माझ्या कामावर आलो असता, बाजार समितीचे शिपाई विलास गायकवाड यांनी माझ्या समक्ष बाजार समितीचे सचिव श्री. राजेंद्र क्षीरसागर यांना तोंडी सांगितले की, बाजार समितीचे कंम्पाउंड तोडून पलिकडे टपरीवजा हॉटेल करीता वाट केली आहे. त्या अनुषंगाने बाजार समितीचे सहाय्यक सचिन आनंदा राजापूरे, अनिल सावंत, विलास गायकवाड, सचिव राजेंद्र क्षीरसागर व मी घटनास्थळी जावून तेथे पाहणी केली. त्याठिकाणी आम्हाला तार कंम्पाउंड तोडून वाट केलेली दिसली. सदरील बाब आम्ही प्रशासन श्री. जी. टी. खामकर यांच्या निदर्शनास आणून दिली. गणेश सावंत यांची जमिन कंम्पाउंडच्या शेजारी आहे. त्यावेळी, गणेश सावंत असे बोलला की, संचालक मंडळ आल्यानंतर मी ते कंम्पाउंड जोडून देईन. त्यानंतर, श्री. क्षीरसागर यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज रोजी गैरहजर आहे. (नि.क्र.३८ वरील आदेशान्वये आरोपीची आजची गैरहजेरी माफ करण्यात आली.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. खामकर -**

२. कथित घटनेच्या वेळी मी बाजार समितीत लिपिक पदावर कार्यरत होतो. मी पोलिसांना तपासात कोणतेही कागदपत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीचे कामकाज शासनाच्या पणन खात्या अंतर्गत चालते. हे म्हणणे खरे आहे की, पणन खात्याने माझी नियुक्ती केली आणि त्याअनुषंगाने मी बाजार समितीत कार्यरत आहे असे दर्शविणारा कोणताही आदेश प्रस्तुत प्रकरणात दाखल नाही. श्री. क्षीरसागर यांनी दिलेली तक्रार मी प्रत्यक्ष वाचून पाहिली नाही. फिर्यादीने फिर्याद देताना माझ्या नावाचा उल्लेख साक्षीदार म्हणून केल्याचे किंवा न केल्याचे मला माहिती नाही. मी मागील ९ वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती, वाई

येथे काम करत आहे. आरोपी गणेश सावंत याने बाजार समितीशी माहितीच्या अधिकाराखाली मागविलेल्या माहितीच्या पत्रव्यवहाराबाबत मला माहिती आहे. तथापि, सदरची माहिती काय होती याविषयी मला वैयक्तीरित्या माहिती नाही. दिनांक ०२.०६.२०२३ रोजी बाजार समितीचे प्रभारी सचिव म्हणून राजेंद्र पांडूरंग क्षीरसागर कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्याकरीता शासनाची अथवा पणन विभागाची पुर्व परवानगी लागते. कथित तार कंम्पाउंडच्या लगत असलेल्या गटाचा क्रमांक अथवा क्षेत्र मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समिती कोणत्या वर्षी स्थापन झाली त्याचे बांधकाम कधी पुर्णत्वास आले या संबंधित कोणतेही कागदपत्र मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समिती वाई येथे अनेक अंतर्गत रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रस्ते नगररचना विभागाने मंजूर केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरील अंतर्गत रस्त्यांचा वापर शेतकरी व व्यापारी यांच्यासाठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गणेश सावंत शेतकरी आहे. मी बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर वाहनांना प्रवेश देण्याकरीता बसलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीत सि.सी.टी.व्ही कॅमेरे आहेत. पोलिसांनी त्या अनुषंगाने कोणतेही तपासकाम न केल्याचे मला माहिती नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती व गणेश सावंत यांच्यातील तहसिल कार्यालय, वाई येथे प्रलंबित वादाबाबत मला माहिती आहे. तथापि, त्या वादाचे स्वरूप काय होते आणि त्यात काय आदेश पारित झाले होते याची वैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रशासकाची नियुक्ती त्यावेळी पाच वर्षांकरीता झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रशासकांनी फिर्याद देण्याबाबत लेखी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी यांच्याशी माझे सलोख्याचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, त्यांच्या सांगण्यानुसार मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कंम्पाउंड तोडून आरोपीने वाट केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच घटनास्थळाची पाहणी केल्याचे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने संचालक मंडळ आल्यावर कुंपण जोडून देतो असे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. **उलटतपास पुर्ण. फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.१३.०३.२०२६

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.